महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे     Rs.2/-     कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ ११ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०२० ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# कल्याण बाजार समितीवर महायुतीचा झेंडा

## सभापती पदी रवींद्र घोडविंदे तर उपसभापती पदी जालिंदर पाटील यांची बिनविरोध निवड









दै. ठाणे जीवनदीप वार्ता


**कल्याण :** कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदी रवींद्र घोडविंदे तर उपसभापती पदी जालिंदर पाटील यांची बिनविरोध निवड झाली. सभापती व उपसभापती या दोन्ही पदावर भाजपाने शिक्कामोर्तब करत बाजार समितीवर महायुतीचा झेंडा फडकवला.



> कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पायाभूत विकासाला प्राधान्य देऊन सभापती, उपसभापती व संचालक मंडळाने काम करावे. या बाजार समितीच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही.
> ■ आमदार किसन कथोरे.



> कल्याण बाजार समितीवर एकहाती सत्ता महायुतीची आहे. सभापती, उपसभापती व संचालक मंडळ एक जुटीने काम करेल त्यांना महायुतीचे सर्व वरिष्ठ नेते मदत करतील.
> ■ गोपाळ लांडगे शिवसेना नेते.



> कल्याण बाजार समितीच्या मार्केट यार्ड मधील सर्व घटकांच्या विकासासाठी पदाधिकारी व संचालक काम करतील. त्यांच्यावर आमचा अंकुश असेल. ■ प्रमोद हिंदुराव
> प्रदेश उपाध्यक्ष राष्टवादी काँग्रेस.

कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अठरा संचालक पदाच्या जागांसाठी नुकत्याच झालेल्या निवडणुकीत महायुतीच्या भाजपा शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाने एक हाथी सत्ता काबीज करत सर्वाधिक सोळा जागा पटकावल्याने महायुतीचा बाजार समितीवर झेंडा फडकाविला. बाजार समितीच्या निवडणुकीत भाजपाचे आमदार किसन कथोरे यांनी कल्याण तालुक्यावर आपली पकड असल्याचे दाखवून देत शेतकरी पतसंस्था व ग्रामपंचायतीच्या जागा स्वबळावर निवडून आणल्याने कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीवर आपले वर्चस्व दाखवून दिले.

निवडणूक निर्णय अधिकारी विशाल जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली सभापती व उपसभापती पदाची निवडणूक घेण्यात आली. सभापती पदासाठी रवींद्र घोडविंदे व उपसभापती पदासाठी जालिंदर पाटील या दोघांचेच उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. नवनिर्वाचित सभापती रवींद्र घोडविंडे यांच्या गळयात दुसऱ्यांदा सभापती पदाची माळ पडली असून भाजपाचे आमदार किसन कथोरे यांचे खंदे असल्याने सभापती पदाच्या निवडणुकीसाठी आमदार कथोरे हे देखील उपस्थित राहिले होते. उपसभापती जालिंदर पाटील हे या पूर्वी दोन टर्म कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळावर निवडून आले होते व नुकत्याच पार पडलेल्या संचालक पदाच्या निवडणुकीत तिसऱ्यांदा निवडून आले आहेत.

यावेळी बोलताना सभापती घोडविंदे यांनी सांगितले की, कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील अंतर्गत रस्त्याची अवस्था बिकट झाल्याने संचालक मंडळातील सर्व पक्षातील सदस्यांना एकत्रित घेऊन रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे प्राधान्याने केली जाणार असल्याचे सांगितले तसेच बाजार समितीच्या आवारातील फुल, भाजी मार्केट मधील साठलेला कचऱ्याचा ढीग रस्त्यावर जागोजागी पडलेला दिसत असल्याने या साचल्या जाणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी बायोगॅस प्रकिया प्रकल्प राबवून त्या पासून खत निर्मितीचा प्रकल्प येत्या काळात सुरू करण्यात येणार आहे. तसेच बाजार समितीच्या उत्पन्न वाढीसाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले.





## माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांना क्लीन चिट



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांना सीबीआयकडून क्लीन चिट मिळाली आहे. महाविकास आघाडी सरकारमध्ये परमबीर सिंह आणि इतर पोलिस अधिकारी यांच्यावर ५ गुन्हे दाखल करण्यात आले होते. कोपरी आणि बाजारपेठ पोलिस ठाण्यात परमबीर यांच्यावर २ स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले होते. दरम्यान, ही प्रकरणे पुढील तपासासाठी सीबीआयकडे वर्ग करण्यात आली होती. मात्र तक्रारीच्या अनुषंगाने तपासात तथ्य न आढळल्याने सीबीआयने न्यायालयात दोन्ही गुन्ह्यासंदर्भात क्लोजर रिपोर्ट दाखल केला. हा रिपोर्ट संबंधित न्यायालयाने स्वीकारला आहे. परमबीर सिंह यांच्यावर भ्रष्टाचार, खंडणी आणि सत्तेचा दुरुपयोग केल्याचे गंभीर आरोप ठेवण्यात आले होते. हे गुन्हे कोपरी, बाजारपेठ, मरीन ड्राइव्ह, गोरेगाव आणि ठाणे शहर पोलिस ठाण्यात दाखल केले होते. यातील कोपरी आणि बाजारपेठ पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यांचा तपास नंतर सीबीआयकडे सोपवण्यात आला होता.

## लाडक्या बहिणींसाठी काम करणारे बचत गट मानधनापासून वंचित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - शासनाच्या लाडक्या बहिणी योजनेंतर्गत काम करणाऱ्या कल्याण, डोंबिवली परिसरातील महिला बचत गटांना त्यांच्या मानधनाचे पैसे दीड वर्ष होत आले तरी शासनाकडून न मिळाल्याने महिला बचत गटातील महिला सदस्यांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. हेच काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकांना मात्र मानधन देण्यात येत आहे. मग महिला बचत गटांवर अन्याय का केला जात आहे, असे प्रश्न महिला बचत गटाच्या सदस्या करत आहेत.

गेल्या वर्षी शासनाने राज्यातील महिलांसाठी लाडकी बहिण योजना आणली. दरमहा महिलांना दीड हजार रूपये देण्याचा शासनाने निर्णय घेतला. लोकसभा, विधानसभा निवडणुकीपूर्वी या योजनांची अंमलबजावणी करायची असल्याने शासन अधिकाऱ्यांबरोबर सरकारने महिला बचत गटाच्या सदस्या, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, काही सामाजिक संस्था यांना लाडक्या बहिणींचे अर्ज भरण्याची कामे दिली. एका अर्जामागे ५० रूपये देण्याचे आश्वासन शासनातर्फे महिला बचत गट आणि संबंधितांना दिले होते. बसल्या जागी काम मिळाले म्हणून कल्याण डोंबिवली भागातील अनेक महिला बचत गटांनी आपल्या भागातील महिलांचे लाडक्या बहिणी योजनेचे ऑनलाईन अर्ज भरण्याचे काम घेतले.

# विधानसभेत जनसुरक्षा विधेयक मंजूर



हे विधेयक सादर करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अनेक लोक भारतीय सविधानाने जी व्यवस्था उभी केली आहे, ती आम्हाला मान्य नाही आणि म्हणून आमचा हा लढा आहे, असे म्हणत आहेत. आम्हाला साम्यवादी व्यवस्था उभी करायची आहे, अशा प्रकारच्या विचारातून या संघटना तयार झाल्या आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये केंद्र आणि विविध राज्य सरकारांनी काम केल्यानंतर हा माओवादी संपुष्टात येत आहे."

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** बहुचर्चित राज्य जनसुरक्षा विधेयक बहुमताने मंजूर करण्यात आलं आहे. शहरी नक्षलवाद आणि लोकशाहीविरोधी संघटनांचा बिमोड करण्यासाठी हे विधेयक मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत मांडलं होतं. तब्बल 12,500 सूचनांचा अभ्यास करुन राज्य जनसुरक्षा विधेयक विधानसभेत सादर करण्यात आलं होतं. ते आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आलं आहे. या विधेयकाला डहाणूचे आमदार विनोद निकाले यांचा एकमेव विरोध होता. त्यामुळे बहुमताने हे विधेयक मंजूर झाल्याची घोषणा करण्यात आली. दरम्यान वादग्रस्त जनसुरक्षा विधेयकातील काही कठोर तरतुदींमध्ये बदल करण्यात आला असून, हे विधेयक सौम्य करण्यात आले आहे. मूळ विधेयकात व्यक्ती आणि संघटना यांच्या बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध अशी तरतूद होती याऐवजी कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटना, असा बदल करण्यात आला आहे. यामुळे सरकारला सरसकट कोणाच्याही विरोधात अटकेची कारवाई करता येणार नाही. दरम्यान जनसुरक्षा विधेयकातील कठोर तरतुदींना सामाजिक संघटनांनी विरोध दर्शवला होता. या कायद्यानुसारचे सर्व गुन्हे दखलपात्र असून अजामीनपात्र आहेत. संघटनांच्या मालमत्तेचा शासनाने ताबा घेतल्यास संबंधित अधिकाऱ्याच्या विरोधात दिवाणी किंवा फौजदारी दावा करता येणार नाही. संघटनेचा एकही सदस्य बेकायदेशीर कृत्य करत असल्यास तोपर्यंत संघटना अस्तित्वात असल्याचे मानले जाणार आहे.

या कायद्याच्या कार्यवाहीस कोणत्याही न्यायालयास मनाई हुकूम देता येणार नाही. तसेच जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय अधिसूचित जागेत प्रवेश केल्यास तो फौजदारी प्रवेश मानला जाणार होते. मात्र, यातील काही तरतुदींमध्ये आता बदल करण्यात आला आहे.















गणपती बाप्पा मोरया

# गणेशोत्सव झाला राज्य महोत्सव !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** सामाजिक एकता, बंधुता आणि समरसतेची समृद्ध परंपरा असलेल्या गणेशोत्सवाला महाराष्ट्र राज्याचा महोत्सव म्हणून ओळख मिळाली आहे. याबाबत भाजप नेते आशिष शेलार यांनी नुकतीच घोषणा केली. गणेशोत्सव आता महाराष्ट्र राज्याचा महोत्सव म्हणून ओळखला जाईल, असे त्यांनी घोषित केले. त्यामुळे गणेशभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण असून शासनाच्या निर्णयाचे गणेशभक्तांकडून स्वागत केले जात आहे.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या गणपतीच्या उत्सवाला अवघे काही आठवडे शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे गणेशभक्तांमध्ये जल्लोषाचे वातावरण असून सर्व गणेशोत्सव मंडळांकडून उत्सवाची जय्यत तयारी सुरू आहे. त्यातच आता महाराष्ट्राचा गणेशोत्सव आता महाराष्ट्र राज्याचा महोत्सव म्हणून ओळखला जाईल, अशी घोषणा आशिष शेलार यांनी केल्यामुळे गणेशभक्तांच्या आनंदात आणखी भर पडली आहे. सध्या राज्य शासनाचे पावसाळी अधिवेशन सुरू असून भाजप आमदार हेमंत रासणे यांनी अधिवेशनात गणेशोत्सवासंदर्भातील प्रश्न उपस्थित केले होते. सध्या राज्यात गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जात आहे. तसेच, गणेश मंडळे अनेक सामाजिक कार्य करत असतात. मात्र, आता या उत्सवावर काही बंधने आली आहेत. त्यामुळे आता हा सण महाराष्ट्र राज्य उत्सव म्हणून जाहीर करावा, तसेच त्यासाठी निधी उपलब्ध द्यावा, अशी मागणी रासणे यांनी केली होती.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी १८९३ मध्ये गणेशोत्सव सुरू केला. त्यापूर्वी घरोघरी हा उत्सव साजरा होत होता. महाराष्ट्र राज्याचा गौरव आणि अभिमान असलेला गणेशोत्सव आता महाराष्ट्र राज्याचा महोत्सव म्हणून घोषित करण्यात आला आहे. देशात आणि जगात गणेशोत्सवाची व्याप्ती आणि प्रचार याबद्दल महाराष्ट्र सरकार कटीबद्ध राहील, असेही त्यांनी म्हटले. पीओपी मूर्तीवरील निर्बंध हटवण्यात आले असून विसर्जन परंपरागत पद्धतीनेच व्हावे, असे धोरण सरकार न्यायालयासमोर मांडत आहे. सरकारचे धोरण गणेशोत्सवासाठी आडकाठीचे असणार नाही, असेही त्यांनी नमूद केले.

# समगळं उभं आहे.....

## पण माणूसपण... कोसळत चाललंय



श्री. रवींद्र घोडविंदे

आजच्या जगात आपण पाहिले तर भौतिक प्रगती आणि विकासाची एक अकल्पित लाट आलेली आहे. उंचच उंच इमारती, वेगवान तंत्रज्ञान, एका बटणावर उपलब्ध होणाऱ्या सोयी-सुविधा, जगाच्या पाठीवर कुठेही संपर्क साधण्याची क्षमता - या सर्व गोष्टी खऱ्या अर्थाने 'उभ्या' आहेत. आर्थिक समृद्धीचे आकडे वाढत आहेत, नवनवीन शोध लागत आहेत आणि मानवी जीवनातील अनेक कष्ट कमी झाले आहेत. शिक्षण, आरोग्य, दळणवळण यांसारख्या क्षेत्रांमध्ये आपण मैलाचे दगड पार केले आहेत. एकंदरीत पाहता, बाह्यतः जग खूप मजबूत आणि स्थिर उभे असल्याचे दिसते.

परंतु, या भौतिक विकासाच्या गडद छायेत एक गंभीर आणि चिंताजनक सत्य लपलेले आहे: 'माणूसपण कोसळत चाललंय'. माणूसपण म्हणजे केवळ मानवी शरीराचा अस्तित्व नव्हे, तर ती भावना, संवेदना, सहानुभूती, नैतिकता, परोपकार आणि दुसऱ्यांबद्दलची आत्मीयता होय. हीच माणुसकी आज हळूहळू नाहीशी होत असल्याचे दिसत आहे.

**माणूसपण कोसळण्याची कारणे आणि लक्षणे:**

**स्वार्थ आणि व्यक्तिवाद:**

आधुनिक समाजात 'मी आणि माझे' या विचाराने मूळ धरले आहे. स्पर्धा आणि भौतिक ध्येयांच्या मागे धावताना लोक एकमेकांपासून दुरावत आहेत. दुसऱ्यांच्या गरजा, दुःख आणि अडचणींकडे दुर्लक्ष करण्याची वृत्ती वाढत आहे.

**संवादहीनता आणि दुरावा:**

तंत्रज्ञानाने जगाला जोडले असले तरी, माणसा-माणसांतील प्रत्यक्ष संवाद कमी होत आहे. कुटुंबातील सदस्यही एकमेकांशी संवाद साधण्याऐवजी मोबाईल फोनमध्ये गुंतलेले दिसतात. या आभासी जगात खरी नाती आणि भावनांची कदर कमी होत आहे.

**संवेदनशीलता हरवणे:**

रस्त्यावर एखादा गरीब किंवा गरजू व्यक्ती दिसल्यास अनेकदा लोक दुर्लक्ष करतात. अपघात किंवा आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी धावून येणाऱ्यांची संख्या कमी होत आहे. दुसऱ्यांच्या दुःखावर सहज प्रतिक्रिया न देण्याची, किंवा त्याकडे संवेदनहीनपणे पाहण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

**नैतिक मूल्यांची घसरण:**

प्रामाणिकपणा, सचोटी, वचनबद्धता यांसारखी नैतिक मूल्ये दुय्यम ठरवली जात आहेत. भ्रष्टाचार, फसवणूक आणि अनैतिक मार्गांनी प्रगती साधण्याची प्रवृत्ती वाढलेली दिसते, ज्यामुळे सामाजिक विश्वास कमी होत आहे.

**गरिबी आणि विषमतेकडे दुर्लक्ष:**

एकीकडे प्रचंड पैसा आणि समृद्धी दिसत असताना, दुसरीकडे मोठ्या प्रमाणात गरिबी, उपासमार आणि वंचितता आहे. या विषमतेकडे समाजाचे डोळे झाकले जात आहेत, आणि 'माझे काम झाले' ही भावना वाढत आहे.

**नैसर्गिक आपत्ती आणि माणुसकी:**

जेव्हा नैसर्गिक आपत्ती येतात, तेव्हा माणुसकी जागृत होते, पण ती अल्पकाळ टिकणारी असते. त्यानंतर पुन्हा दैनंदिन जीवनातील धावपळीत आपण माणुसकी विसरून जातो.

आज खऱ्या अर्थाने आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. आपण ज्या भौतिक प्रगतीचा अभिमान बाळगतो आहोत, ती जर माणुसकीच्या पायावर उभी नसेल, तर ती कितीही उंच असली तरी ती कधीही कोसळू शकते. इमारती कितीही मजबूत असल्या तरी, आत राहणारे लोकच जर संवेदनाहीन असतील, तर त्या इमारतींना काय अर्थ?

'सगळं उभं आहे' हे सत्य आहे, पण हे केवळ बाह्य स्वरूप आहे. खरा धोका 'माणूसपण कोसळत चाललंय' यात आहे. माणुसकी जपण्यासाठी आपल्याला स्वतःपासून सुरुवात करावी लागेल. लहानसहान कृतीतून, संवादातून, सहानुभूतीतून आणि परोपकाराच्या भावनेतून आपण या कोसळणाऱ्या माणूसपणाला पुन्हा उभारी देऊ शकतो. अन्यथा, भविष्यात आपण केवळ यांत्रिक आणि भावनाशून्य जगाचे नागरिक बनून राहू, जिथे 'सगळं उभं असेल', पण 'माणूस' मात्र कोसळलेला असेल.

# कळंभे जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेत चमकदार कामगिरी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कळंभे ही केंद्र तुळई अंतर्गत ग्रामीण भागातील असलेली शाळा आहे.या शाळेचे शैक्षणिक वर्ष 2024- 25 या वर्षात 2 विद्यार्थी इयत्ता पाचवीची शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. मागील वर्षी सुद्धा या शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत 2 विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते.शाळा व्यवस्थापन समिती कळंभे यांच्या वतीने पात्र विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक अविनाश सुरोशे सर यांचे अभिनंदन करण्यात आले. यावर्षी सुद्धा इयत्ता पाचवीच्या सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेत बसवण्याचे ठरवले आहे. सेवा सहयोग फाउंडेशन यांच्या सहकार्याने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शक पुस्तिका वाटप करण्यात आल्या आहेत.

### सफाई कर्मचारी आयोगाच्या दौऱ्यानंतरही

# भिवंडी पालिका कर्मचारी सुविधांपासून वंचित



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : नगरपालिका व महापालिका या स्थानिक स्वराज्य संस्थे मध्ये काम करणाऱ्या कामगार कर्मचाऱ्यांना शासकीय नियमानुसार सुविधा उपलब्ध करून देणे हे प्रशासनाचे काम आहे.मात्र महापालिका प्रशासनाकडून त्या कामात दिरंगाई होत असल्याने कामगार वर्ग नेहमी विविध योजना व सुविधांचा पासून वंचित राहत असल्याचा गंभीर प्रकार भिवंडी महापालिकेत उघड झाला आहे. त्यामुळे पालिकेत कार्यरत असलेल्या कामगार संघटना या लवकर राज्याचे मुख्यमंत्री,नगरविकास सचिव व महाराष्ट्र राज्य सफ़ाई कर्मचारी आयोगाच्या अध्यक्षांची भेट घेऊन निवेदन सादर करणार आहेत.

भिवंडी महापालिकेत २४०० हून अधिक सफाई कर्मचारी कार्यरत आहेत.गेल्या काही वर्षांपासून भिवंडी मनपा सफाई कर्मचाऱ्यांना आरोग्य,निवासस्थान,पदोन्नती, पगार अशा विविध समस्या भेडसावत आहेत. त्यामुळे ते पालिकेतील कामगार संघटना चे मदतीने समस्यांचे निराकरण करून घेत आहेत, संघटनेचे पाठपुराव्याने मुळे पालिका प्रशासनाकडून सफाई कर्मचाऱ्यांना सेवा सुविधा काही प्रमाणात पुरविण्यात येतात,मात्र अनेक वेळा या सेवा सुविधा कर्मचाऱ्यांसाठी अपुऱ्या पडत असल्याने त्यामुळे कामगार संघटना कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी नेहमीच प्रशासनाशी भांडतांना भिवंडी मनपात दिसत आहेत.

मनपा सफाई कर्मचाऱ्यांचे घरे व वसाहती इमारती धोकादायक झाल्याने मनपा प्रशासनाने पाच वर्षांपुर्वी तोडून टाकली आहेत. मात्र अजूनही ही घरे बनली नसल्याने सफाई कर्मचाऱ्यांना इतर ठिकाणी भाड्यावर घर घेऊन राहण्याची वेळ आली असल्याची माहिती भारतीय कामगार कर्मचारी महासंघ युनिट चे सचिव श्रीपती तांबे यांनी दिली. कामगारांची निवासस्थान तातडीने उभारण्यात यावी यासाठी युनियन चेवतीने लेखी पत्र देण्यात आले आहे मात्र पालिका प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची हालचाल होत नसल्याने कामगार नाराजी व्यक्त करीत आहेत.

मनपा कर्मचाऱ्यांचा मासिक पगार नियमित वेळेवर होत नसल्याने अनेक कर्मचाऱ्यांनी बँकेतून पतपेढीतून व सावकारी इसमान कडून कर्ज काढले आहेत. यामुळे मनपाचे अनेक सफाई कर्मचारी कर्जाच्या ओझ्या खाली आहेत.तर काही कर्मचाऱ्यांनी खाजगी सावकारांकडून पैसे घेतल्याने त्यांची कर्ज फेडताना नाकेनऊ येत आहेत. त्यामुळे कामगार कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवरच होणे आवश्यक आहे अशी मागणी कामगार नेते संतोष चव्हाण, भानुदास भसाळे यांनी केली आहे.पालिकेतील १२/२४ च्या फरकाच्या रक्कमेचा प्रलंबित निर्णय अजूनही झाला नसल्याने अनेक कर्मचारी हक्काच्या पैशांपासून वंचित आहेत.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत सलग २५ वर्ष सेवा केलेल्या कर्मचा-यांस मोफ़त घर देण्यात यावे. जे कर्मचारी शासकीय वसाहतीत मागील ३५ वर्षापासून एकाच घरात वास्तव्य करतात त्यांचे नावे पट्टा करावा असे नमुद करण्यात आले आहे तसेच कर्मचा-यांना ग्लोज, मास्क, रेनकोट व इतर सुविधा देणे, त्यांची वैद्यकीय तपासण्या वेळोवेळी घेण्यात याव्यातच इतर जास्तीत जास्त सुविधा देण्याच्या सूचना आयोगाने केल्या आहेत मात्र त्या मिळत नसल्याने कामगार नाराज असुन याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व नगर सचिव यांच्याकडे लेखी निवेदन सादर करण्यात येणार असल्याची माहिती कामगार संघटना कडून दिली जात आहे.**

मनपा सफाई कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सेवा सुविधा व भेडसावणाऱ्या समस्या यांच्यासाठी महाराष्ट्र राज्य सफ़ाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्षांनी महानगरपालिकेस भेट देऊन सफ़ाई कामगारांच्या विविध समस्यांबाबतचा आढावा घेत सफ़ाई कर्मचा-यांच्या सेवा सुविधा देणेबाबत तसेच त्यांना पदोन्नती देणेबाबत सुचना आयुक्त अनमोल सागर यांना दिल्या मात्र अद्याप कोणत्याही प्रकारची सुविधा उपलब्ध झालेली नाही. सेवाज्येष्ठता डावलून कर्मचाऱ्यांचे नियुक्त्या करण्यात येत आहेत त्यामुळे पालिकेतील कामगार कर्मचाऱ्यां मध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थेत भूमिपुत्र मोठे यश मिळवेल

– चंद्रकांत मोटे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : मागील लोकसभा आणि विधानसभेला भूमिपुत्र पक्षाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तथा भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा बिनशर्त पाठिंबा दिला होता . त्यामुळे आता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये नगरपालिका, महापालिका ,जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्ये सेना-भाजप युतीने भूमिपुत्र पार्टीस सर्वस्वी मदत करावी. ज्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेत भूमिपुत्र पार्टी मोठे यश प्राप्त करेल असे सुतोवाच भूमिपुत्र पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष चंद्रकांत मोटे यांनी केले . ते एका पत्रकार परिषदेत पत्रकारांशी बोलत होते.

नुकताच अंबरनाथ पूर्वे कडील पनवेल कर सभागृहात भूमिपुत्र पक्षाचा ४ था वर्धापन दिनाचा सोहळा पार पडला. त्यात पत्रकारांशी संवाद साधतांना मोटे बोलत होते. याप्रसंगी त्यांनी भूमिपुत्र पार्टीच्या मागील तीन वर्षाचा आढावा घेतला. यादरम्यान, ठाणे आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये अनेक नागरी सुविधांचे, प्रशासकीय प्रश्न सोडवण्यात पक्षाला यश आल्याचेही त्यांनी म्हटले. तसेच अंबरनाथ मध्ये मृत प्राण्यां करीता शवदाहिनीची मागणी ही त्यांनी यावेळी केली. त्याचप्रमाणे शहरातील आरोग्य , रहदारी शैक्षणिक आणि मूलभूत सुविधांचे प्रश्न सोडवण्यासाठी पक्ष कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केली.

सध्या महाराष्ट्रातील पहिलीपासून हिंदी लादण्याची आवश्यकता नाही त्यामुळे पक्षाची हिंदी सक्तीला विरोध असल्यासही मोटे यांनी स्पष्ट केले. त्या पत्रकार परिषदेस मोटे यांच्यासह पक्षाचे राष्ट्रीय सचिव प्रकाश पाटील कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत ग्रामीणचे अध्यक्ष लहू भोईर ठाणे जिल्हा महिला आघाडी उपाध्यक्ष मोना नायर ठाणे जिल्हा उपाध्यक्ष सी के जॉन अंबरनाथ शहर उपाध्यक्ष सुनील पांडा, मनोज कांबळे, अरुण कदम आदी उपस्थित होते.

## गीतासार



**अध्याय १६**

**दैवासुरसम्पद्विभागयोगः**

तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता । भवन्ति सम्पदं दैवीमभिजातस्य भारत ॥ १६-३ ॥

तेज, क्षमा, धैर्य, बाह्य शुद्धी, कोणाविषयीही शत्रुत्व न वाटणे आणि स्वतःविषयी मोठेपणाचा अभिमान नसणे – ही सर्व हे भारता (अर्थात भरतवंशी अर्जुना), दैवी संपत्ती घेऊन जन्मलेल्या माणसाची लक्षणे आहेत. ॥ १६-३ ॥

दम्भो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च । अज्ञानं चाभिजातस्य पार्थ सम्पदमासुरीम् ॥ १६-४ ॥

हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), ढोंग, घमेंड, अभिमान, राग, कठोरपणा आणि अज्ञान ही सर्व आसुरी संपत्ती घेऊन जन्मलेल्या पुरुषाची लक्षणे आहेत. ॥ १६-४ ॥

दैवी सम्पद्विमोक्षाय निबन्धायासुरी मता । मा शुचः सम्पदं दैवीमभिजातोऽसि पाण्डव ॥ १६-५ ॥

दैवी संपदा मुक्तिदायक आणि आसुरी संपदा बंधनकारक मानली आहे. म्हणून हे पांडवा (अर्थात पांडुपुत्र अर्जुना), तू शोक करू नकोस. कारण तू दैवी संपदा घेऊन जन्मला आहेस. ॥ १६-५ ॥

## रेसिपी

# टेस्टी बर्गर



**साहित्य :** दोन- उकडलेले आणि मॅश केलेले बटाटे,दोन - हिरव्या मिरच्या,एक-टेबलस्पून ओरेगॅनो एक- टेबलस्पून गरम मसाला,चवीनुसार मीठ,एक - टेबलस्पून किसलेले चीज,कोथिंबीर , दोन- टेबलस्पून कॉर्न फ्लोअर ,एक-टेबलस्पून ऑल पर्पज पीठ,पाणी ,ब्रेड स्लाईस , टोमॅटो केचप, चीज,ब्रेड क्रम्ब्स

**कृती-** सर्वात आधी एका मोठ्या भांड्यात २ उकडलेले आणि मॅश केलेले बटाटे घ्या. त्यात चिरलेल्या हिरव्या मिरच्या, मिरच्यांचे तुकडे, ओरेगॅनो, चीज, गरम मसाला, मीठ आणि कोथिंबीरची पाने घाला. सर्व काही चांगले मिसळा. तुम्ही स्टफिंगमध्ये कॅप्सिकम किंवा गाजर सारख्या तुमच्या आवडीच्या भाज्या देखील घालू शकता. आता ब्रेड स्लाईस घ्या आणि ते गोल आकारात कापून घ्या. ब्रेड स्लाईसवर टोमॅटो केचप पसरवा आणि वर किसलेले चीज घाला. त्यावर दुसरा ब्रेड स्लाईस ठेवा. आता बटाट्याच्या भरण्याचा थोडासा भाग घ्या आणि तो ब्रेडवर पसरवा जेणेकरून तो झाकून राहील. एका भांड्यात कॉर्न फ्लोअर आणि पाणी घालून बॅटर बनवा. ब्रेडचे तुकडे दुसऱ्या भांड्यात ठेवा. प्रथम भरलेले ब्रेड कॉर्न फ्लोअरच्या बॅटरमध्ये बुडवा आणि नंतर ब्रेड क्रंबच्या बाऊलमध्ये चांगले उलटा. एका पॅनमध्ये तेल गरम करा. तयार केलेले बर्गर मध्यम आचेवर सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळा.

# 'स्टॉप डायरिया' राष्ट्रीय मोहीम ठाणे जिल्ह्यात प्रभावीपणे सुरू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय आणि जलशक्ती मंत्रालय यांच्या निर्देशानुसार तसेच महाराष्ट्र राज्य शासन व जिल्हा परिषद ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने, "स्टॉप डायरिया" (Stop Diarrhoea Campaign) ही महत्त्वाची जनजागृती मोहीम २० जून २०२५ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

या अभियानाचा उद्देश अतिसारासारख्या पाण्याद्वारे पसरणाऱ्या आजारांपासून बालकांचे आणि नागरिकांचे संरक्षण करणे, स्वच्छता व सुरक्षित पाणी यावर भर देणे, आणि नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा आहे, अशी माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे यांनी दिली.

**अभियानाचा कालावधी व टप्प्यांनुसार कृती आराखडा**

**पहिला व दुसरा आठवडा**

(२० जून ते ३० जून २०२५)

- **अभियानाचा शुभारंभ:** जिल्हा व तालुका स्तरावर बैठकीद्वारे "स्टॉप डायरिया" मोहिमेचा औपचारिक शुभारंभ.
- **पाणी गुणवत्ता तपासणी:** शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्रे व इतर संस्थांमध्ये पाण्याच्या गुणवत्तेचे परीक्षण.
- **प्रशिक्षण व जनजागृती:** नागरिक, शासकीय कर्मचारी व संस्थांना पाणी, स्वच्छता व आरोग्य यावरील प्रशिक्षण.
- पाणी व स्वच्छता मिशनच्या बैठकांचे आयोजन.

**तिसरा व चौथा आठवडा**

(१ जुलै ते १५ जुलै २०२५)

- **गावपातळीवर पाणी समित्यांचे सक्षमीकरण:** स्थानिक पातळीवरील पाणी स्रोत व स्वच्छतेच्या सुविधांचे व्यवस्थापन.
- **जागृती मोहीम:** स्वच्छतेचा दर्जा राखण्याकरिता गावकऱ्यांचा सहभाग.
- मैलागाळ व्यवस्थापन व स्वच्छ भारत मिशनचा प्रचार.
- घरगुती नळ जोडण्याची कार्यपद्धती तपासणे.

*** पाचवा व सहावा आठवडा**

(१६ जुलै ते ३१ जुलै २०२५)

- **गावपातळीवरील प्रशिक्षण:** ग्रामस्थांना स्वच्छतेच्या सवयी अंगिकारण्यासाठी NGO व समूहांमार्फत प्रशिक्षण.
- **पावसाळी पाणी संकलनावर जागरूकता:** छतावरील पाणी संकलन आणि पाणी साठवणुकीबाबत माहिती.
- हातपंपांची तपासणी व दुरुस्ती.
- स्वच्छ भारत मिशन अंतर्गत हागणदारीमुक्तता व स्वच्छ वर्तनाविषयी जनजागृती.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे रोहन घुगे यांचे आवाहन: "सर्व विभागांनी एकत्रितपणे समन्वयाने काम करून 'स्टॉप डायरिया' मोहिमेचा प्रभाव गावागावात जाणवेल अशा पद्धतीने यशस्वीपणे राबवत आहेत. ही मोहीम केवळ आरोग्याशी संबंधित नसून, ती सुरक्षित पाणी, स्वच्छता आणि सशक्त समुदाय विकासाची पायाभूत गरज आहे म्हणून सर्व ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था यांनी सहभाग नोंदवावा."

# सेवा, समर्पण आणि शिस्त म्हणजे श्रींची बैठक

– सरपंच साक्षी साठे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : सेवा, समर्पण आणि शिस्त म्हणजे श्रींची बैठक असे उदगार सरपंच साक्षी संतोष साठे यांनी काढले.

आबिटघर येथे महाराष्ट्र भूषण नानासाहेब धर्माधिकारी यांच्या पुण्यतिथी निमित्त "वृक्षरोपण व संवर्धन अभियाना"अंतर्गत श्री बैठक केंद्र अबिटघर यांच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सरपंच साक्षी साठे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

पर्यावरणाचा ढासळणारा समतोल राखण्याच्या हेतूने झाडांचे संवर्धन होणे खुप गरजेचे आहे या अनुषंगाने येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या आयोजित कार्यक्रमप्रसंगी संबोधित करताना साक्षी साठे यांनी महाराष्ट्र भूषण नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान व श्री सदस्य यांच्या सामाजिक कार्याची प्रशंसा करून मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमावेळी सरपंच साक्षी साठे, पोलीस पाटील सीमा पाटील, ग्रामपंचायत सदस्य कुलदीप पाटील, धनश्री पाटील, श्रींच्या बैठकीचे दास ज्ञानेश्वर खाडे, चंद्रकांत पाटील व मोठ्या संख्येने बैठक सदस्य उपस्थित होते.



## आजचे राशि भविष्य

**मेष**

तुम्ही जे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहात ते आज साध्य होऊ शकते. आज तुम्हाला तुमचे लक्ष्य साध्य करण्यासाठी अधिक मेहनत करावी लागेल.

**वृषभ**

काम कितीही कठीण असले तरी एकाग्रता टिकवून ठेवावी लागेल.तुम्हाला ऑफिसमध्ये नवीन प्रोजेक्ट मिळेल, तुमच्या सहकाऱ्यांची मदत मिळेल.

**मिथुन**

मुलांकडून आनंद मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाईल.तुम्ही तुमचे व्यावसायिक संपर्क मजबूत करण्याचा प्रयत्न कराल .

**कर्क**

एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीशी किंवा राजकारणी व्यक्तीशी भेटणे फायदेशीर ठरेल. व्यवसायात आज तुम्हाला फायदा होईल.मानसिक शांती मिळेल.

**सिंह**

कामाच्या ठिकाणी तुमचे काम चांगले होईल. तुम्हाला काही कामात मदत लागेल, या बाबतीत तुम्हाला एखाद्या चांगल्या मित्राचा सल्ला मिळेल. महत्त्वाची

**कन्या**

कामे सकारात्मक दृष्टिकोनाने पूर्ण करता येतील.आज व्यवसायात नफा मिळविण्यासाठी तुम्हाला कोणाची तरी मदत घ्यावी लागेल.

**तूळ**

तुम्हाला वादविवादांपासून दूर राहावे लागेल जेणेकरून तुम्ही तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करू शकाल कठोर परिश्रम करावे लागतील.

**वृश्चिक**

विरोधक तुमचे नुकसान करण्याचा अयशस्वी प्रयत्न करतील. या राशीचे लोक जे सरकारी सेवेत आहेत त्यांना काही उत्कृष्ट असाइनमेंट मिळू शकते.

**धनु**

कोणतेही नियोजित काम पूर्ण होईल.तुम्ही काही काम करण्याच्या नवीन पद्धतीचा विचार कराल, यामुळे काम वेळेवर पूर्ण होण्यास मदत होईल.

**मकर**

विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे. तुमच्या कामाला नवीन स्वरूप देण्यासाठी तुम्हाला काही सर्जनशील क्रियाकलापांमध्ये देखील रस असेल.

**कुंभ**

विद्यार्थ्यांना स्पर्धेशी संबंधित कार्यात यश मिळू शकते. आज तुम्हाला नवीन कामाचा विचार करण्याची पूर्ण संधी मिळू शकते.

**मीन**

विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे, परंतु अभ्यासात अजून मेहनत करावी लागेल. कुटुंबातील सदस्यांसोबत चांगला वेळ घालवायला मिळेल.







# साथरोग नियंत्रणासाठी केडीएमसीची विशेष कार्यवाही



कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात असलेल्या बंद बांधकाम साईट्स आहेत. या बंद पडलेल्या कंस्ट्रक्शन साईट्स मधील पाणीसाठे यांमुळे डासआळया निर्माण होऊन किटकजन्य आजारात वाढ होऊ नये याकरिता, कडोंमपा कार्यक्षेत्रातील बंद साईट्स वर संबंधित स्वच्छता निरीक्षक यांना सुचना देऊन धुरावणी, फवारणी, आईलिंग व इतर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याबाबत सुचना देण्यांत आलेल्या आहेत.

डॉ. दीपा शुक्ल,
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
कल्याण डोंबिवली महानगरपालिका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बेतुरकर पाडा, कल्याण पश्चिम येथील विलास भगवान म्हात्रे यांना ०७ जुलै रोजी रुक्मिणीबाई रुग्णालयात दाखल करण्यांत आलेले होते. सदर रुग्णालयात रुग्णावर उपचार सुरु होते, मात्र प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने सदर रुग्णास सायन रुग्णालयात संदर्भित करण्याचा सल्ला दिला. परंतु, रुग्णाच्या नातेवाईकांनी त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारा दरम्यान म्हात्रे यांचा १० जुलै रोजी खाजगी रुग्णालयात संशयित डेंग्युने मृत्यु झाला आहे.

या पार्श्वभूमीवर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता महापालिका क्षेत्रात डेंग्यू आणि मलेरियाच्या नियंत्रणासाठी आरोग्य विभागामार्फत विशेष कार्यवाही करण्यात येत आहे अशी माहिती देण्यात आली

**वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत करण्यांत येणारी कार्यवाही**

साथीच्या रुग्णांवर औषधोपचार करण्याकरीता शास्त्रीनगर रुग्णालय, डोंबिवली व बाई रुक्मिणीबाई रुग्णालय, कल्याण, ४ दवाखाने व २६ नागरी आरोग्य केंद्रांतील ओपीडी, आरोग्यवर्धिनी केंद्रे, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, आपला दवाखाना येथील ओपीडी मध्ये येणाऱ्या रुग्णांवर उपचार करण्यांत येतात.

- प्रभागात गटचर्चा तथा सभा अयोजित करुन डेंग्यू प्रतिबंधक कार्यवाहीची नागरिकांना माहिती देणे. याकामी स्वयंसेवी संस्था, प्रभागक्षेत्र अधिकारी तसेच आवश्यकतेनुसार महाविदयालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग घेणे.
- नागरिकांना डेंग्यु व हिवतापा बाबत आरोग्य शिक्षण देणे. हस्तपत्रके वाटप करणे पोस्टर्स, बॅनर यांच्या माध्यमातुन जनजागृती करणे.
- पावसाळ्यात पाणी साचुन डासांच्या उत्पत्तीत वाढ होवून हिवतापाची साथ पसरण्याची शक्यता असते. यासाठी डास व अळीनाशक फवारणी तसेच हिवताप रुग्ण लागण / मृत झाला असल्यास त्यांच्या व आजूबाजूच्या सर्व घरात फवारणी करणे.
- बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी यांचेमार्फत डासांची निर्मीती स्थाने उदा. घराती फुलदाणी, कुंडया, शोचे बांबु, फेंगशुई, मनीप्लांट, फिशटँक, येथे सर्वेक्षणा दरम्यान डासअळ्या आढळून आल्यास सदर कंटेनर/भांडी रिकामे करण्यांत येते. वापरावयाच्या पाण्यांत डासअळीनाशक कार्यवाही अॅबेट टाकण्यांत येते.
- नागरी आरोग्य केंद्रा अंतर्गत संवेदनशील भागांचे जलद ताप सर्वेक्षण करुन डासोउत्पत्ती स्थाने शोधुन ती नष्ट करण्यांत येतात. तसेच, हिवताप व डेंग्यु आजाराचे सर्वेक्षण करुन रक्तनमुने घेण्याकरिता कार्यवाही करण्यांत येते.
- बांधकामाच्या ठिकाणी साठलेले व साठवलेल्या पाण्यात डासअळीची वाढ होणार नाही याची दक्षता घेणेबाबत संबधित बांधकाम व्यावसायिकास बंधनकारक करून डासअळी प्रतिबंधक कार्यवाही न करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकास नोटीस बजावण्यांत आलेल्या आहेत.
- सर्व सोसायटया व गृहनिर्माण संस्था यांना घर/बिल्डींगच्या टेरेस व परिसरातील टायर, फुटकी भांडी, येथे पाणी साचुन राहणार नाही. तसेच बिल्डींगवरील व जमिनीमधील पाण्याची टाकी इत्यादींवर घट्ट झाकणे बसवण्यांत यावीत. कोठेही पाणी साचुन राहणार नाही याची दक्षता घेणेबाबत गृहनिर्माण संस्था यांना नोटीस बजावण्यांत आलेल्या आहेत.
- डासांची अंडी ही साचुन राहणाऱ्या स्वच्छ पाण्यामध्ये वाढतात. त्यामुळे आठवडयातुन एक दिवस कोरडा दिवस पाळावा असे आवाहन वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपा शुक्ल यांनी केले आहे.



## शिर्डीत गुरुपौर्णिमा उत्सव संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

श्री गुरुपौर्णिमा उत्सवाचे मुख्य दिवशी लेंडीबागेतील शताब्दी ध्वजाचे संस्थानचे अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजु शेंडे (सोनटक्के) व त्यांचे पती श्री. प्रेमानंद सोनटक्के तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर व सौ. वंदना गाडीलकर यांच्या हस्ते पुजन करण्यात आले. यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे, मुख्य लेखाधिकारी मंगला वराडे, मंदिर विभाग प्रमुख विष्णु थोरात, प्र.जनसंपर्क अधिकारी दिपक लोखंडे, मंदिर पुजारी, शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते

## भिवंडी मनपा आयुक्तांच्या पालिका शाळांना भेटी डिजिटल क्लासरूमच्या वापरावर भर देण्याचे निर्देश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी दि.०९ :** भिवंडी मनपा आयुक्त अनमोल सागर, मा. उपायुक्त बाळकृष्ण क्षिरसागर व प्रशासनाधिकारी सौदागर शिखरे यांनी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या शांतीनगर, नारळी तलाव मधील शाळांना भेट दिली त्या ठिकाणच्या सदर शाळेची इमारतीबाबत शौचालय, विद्युत पुरवठा, स्वच्छता या बाबत माहीती घेण्यात आली व संबंधीत विभागांना या वावत सुधारणा करण्यासाठी सुचना देण्यात आल्या. शाळेच्या इमारतीत असलेल्या सर्व शाळांच्या



मुख्याध्यापकांची संयुक्त समिती करावी व त्यामार्फत शाळेच्या सुरक्षेबाबत, स्वच्छतेबाबत व इतर भौतिक सोईसुविधांबददल पाठपुरावा करण्याच्या सुचना देण्यात आल्या. त्याचप्रमाणे विद्यार्थी पटसंख्या, शिक्षक उपस्थिती तसेच शालेय अभिलेखांची तपासणी केली व त्या संदर्भात सर्व उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन केले तसेच डिजिटल क्लासरूम चा नियमित वापर करण्याकरीता वर्ग निहाय व विषय निहाय वेळापत्रक तयार करण्याबाबत सर्व शिक्षकांना निर्देश दिले. शालेय इमारती, वर्ग खोल्या, शाळेचा परिसर व शौचालय यांची दररोज नियमितपणे स्वच्छता करणेबाबत संबंधित प्रभाग अधिकारी यांना सुचना दिल्या.

## नवीमुंबईत निवडणुकांपूर्वी एकत्रित उद्घाटनांचा धडाका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** महापालिका निवडणुकांसाठी प्रभाग रचनांची आखणी सुरू झाली असताना नवी मुंबईत एकमेकांना पाण्यात पाहणाऱ्या भाजपा आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून एकत्रितपणे विकासकामांच्या उद्घाटनाचा धडाका दिसणार आहे. पालिकेने महत्त्वपूर्ण प्रकल्पांची यादी तयार केली असून त्या प्रकल्पांच्या उद्घाटनाची पूर्वतयारी सुरू आहे.

महापालिका हद्दीतील वेगवेगळ्या विकास कामांचा शुभारंभासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दोन बड्या नेत्यांना आमंत्रित करण्याचा बेत महापालिका प्रशासनाकडून आखला जात आहे. शहरातील स्थानिक राजकारणात हे दोन पक्ष एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले आहेत. असे असताना वेगवेगळ्या प्रकल्पांच्या उद्घाटनासाठी मात्र या दोन्ही पक्षांचे वरिष्ठ नेते शहरात उपस्थित राहणार आहेत. निवडणूक आयोगाने पाच वर्षे रखडलेल्या निवडणुकांसाठीची कार्यवाही सुरू केली आहे. पालिका स्तरावर प्रभाग रचनेच्या कामाला मागील काही दिवसांपासून सुरुवात झाली आहे. नवी मुंबई महापालिका क्षेत्रात १४ गावांसह मिळून प्रभाग रचना होणार असल्याने पालिकेच्या निवडणुक विभागामार्फत शहरात प्रभागरचनेची कामे वेगाने सुरू आहेत. तर दुसरीकडे निवडणुकीच्या पूर्वी शहरात महत्वपूर्ण प्रकल्प पूर्ण करुन त्या प्रकल्पांचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्याचा राज्यातील सत्ताधाऱ्यांचा प्रयत्न आहे.

## जिल्हा परिषदेचा दवाखाना घेण्यास मिरा भाईंदर महापालिकेची टाळाटाळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** जिल्हाधिकाऱ्यांनी हिरवा कंदील दिल्यानंतरही दोन वर्षांपासून मुर्धा गावातील पशु दवाखाना ताब्यात घेण्यास मिरा भाईंदर महापालिकेकडून दिरंगाई केली जात आहे. त्यामुळे हा दवाखाना बंद अवस्थेत असल्याचे दिसून येत आहे. भाईंदर पश्चिम येथे जिल्हा परिषदेच्या काळापासून पशु दवाखाना आहे.

पूर्वी या दवाखान्यात जनावरांवर उपचार केले जात होते. मात्र महापालिकेच्या स्थापनेनंतर या दवाखान्याकडे जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष झाले. परिणामी दवाखाना बंद झाला. त्यानंतर पाच वर्षांपूर्वीच पशु प्रेमींनी आवाज उठवल्यानंतर यावर जवळपास २१ लाख रुपये खर्च करून हा दवाखाना सुरु करण्यात आला. परंतु मनुष्यबळाची कमतरता व इतर समस्या जाणवू लागल्याने पुन्हा त्याला टाळे मारण्यात आले. दरम्यान अगदी मोक्याच्या जागी पशु दवाखान्याची जागा असल्यामुळे ती सुरु करण्यासाठी मिरा भाईंदर महापालिकेकडून जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली होती. याबाबतचा प्रशासकीय ठराव देखील करण्यात आला होता. तर महापालिकेच्या या मागणीला जिल्हाधिकाऱ्यांकडून देखील सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला आहे.

## भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत श्री मलंगगडावर गुरुपौर्णिमा उत्सव साजरा

भाजप आमदार सुलभा गायकवाड, माजी आमदार नरेंद्र पवार, भाजपा कल्याण जिल्हा अध्यक्ष नंदू परब यांची विशेष उपस्थिती ....

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली, ता. १० :** कल्याणजवळील श्री मलंगगडावर गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हिंदू मंच ठाणे जिल्ह्याच्या वतीने मलंगगडावर प्रत्येक महिन्याची पौर्णिमा साजरी करण्यात येते. गुरुवारी (ता. १०) भाजपचे नवनिर्वाचित प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासमवेत कल्याण जिल्ह्यातील भाजपाच्या

पदाधिकाऱ्यांसह साधू, नाथ संप्रदायातील महंतदेखील श्री मलंगगडावर महाआरती सोहळ्यात सहभागी झाले होते. या वेळी भाजपच्या कार्यकर्त्यांनी गडावर मलंगगडमुक्तीच्या घोषणा दिल्या.

कल्याणच्या श्री मलंगगडावर गुरुवारी मोठ्या संख्येने भाविक गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त सहभागी झाले होते. श्री मलंगगडावर गुरुपौर्णिमेच्या उत्सवात मुंबईसह ठाणे, रायगड जिल्ह्यातील श्री मलंग भक्त सहभागी होतात. नुकतीच डोंबिवलीकर व संघाचे स्वयंसेवक राहिलेले रवींद्र चव्हाण यांची भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यामुळे भाजपच्या वतीने गुरुपौर्णिमेनिमित्त 'चलो श्री मलंगगड'चा नारा देण्यात आला होता. भाजपच्या कार्यकर्त्यांनी श्री मलंगगडावर महाआरती करीत 'आई भवानी शक्ती दे, श्री मलंगगडाला मुक्ती दे' अशा घोषणा देत गडावरील परिसर दणाणून सोडला.

कल्याण जिल्हा भाजपच्या पदाधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने हिंदुत्ववादी संघटनांचे कार्यकर्तेदेखील सहभागी झाले होते. चव्हाण पहिल्यांदा प्रदेशाध्यक्ष म्हणून मलंगगडावर आल्याने त्यांचे विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, श्री मलंग सेवा समितीसह हिंदू मंचकडून स्वागत करण्यात आले. श्री मलंगगडचे विश्वस्त केतकर कुटुंबाच्या वतीने अभिजित केतकर यांनी प्रदेश अध्यक्ष चव्हाण यांचे स्वागत केले.

भाजपने या वेळी जोरदार बॅनरबाजी केली होती. प्रत्येक गावाच्या वेशीवर चव्हाण यांच्या स्वागताचे होर्डिंग लावले होते. या वेळी भाजप आमदार सुलभा गायकवाड, माजी आमदार नरेंद्र पवार, भाजपा अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश मंत्री शशिकांत कांबळे, भाजपा कल्याण जिल्हा अध्यक्ष नंदू परब, श्री मलंगगड मंडळ अध्यक्ष समीर भंडारी, माजी नगरसेवक मोरेश्वर भोईर, राजन चौधरी, रविना अमर माळी यांसह भाजपाचे कार्यकर्ते आणि हिंदू मंचचे कार्यकर्ते उपस्थित होते.



# सहा वर्षांनी ठाणे वर्षा मॅरेथॉनचे आयोजन

## महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केली घोषणा

| १० ऑगस्ट रोजी होणार ३१ वी वर्षा मॅरेथॉन | एकूण १० लाख ३८, ९०० रुपयांची पारितोषिके | प्रत्येक गटात प्रथम १० विजेत्यांना पारितोषिके व चषक |
|---|---|---|

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (१०) :** ठाणे महापालिका चषक ३१व्या वर्षा मॅरेथॉनचे रविवार, १० ऑगस्ट रोजी आयोजन करण्यात येत असल्याची घोषणा ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी गुरुवारी केली. ३०वी वर्षा मॅरेथॉन स्पर्धा २०१९मध्ये झाली होती. आता सहा वर्षांनी पुन्हा देशविदेशातील मॅरेथॉनपटूंसह ठाणेकर नागरिक या मॅरेथॉनमध्ये मोठ्या उत्साहाने सहभागी होऊ शकणार असल्याचे प्रतिपादन आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

ठाणे महापालिका चषक ३१वी वर्षा मॅरेथॉन ही ठाण्यासाठी अत्यंत प्रतिष्ठेची मॅरेथॉन आहे. सहा वर्षांच्या खंडानंतर ही मॅरेथॉन होत असल्याने सर्व विभागांनी उत्तम समन्वय साधून ही मॅरेथॉन यशस्वी करावी. गेल्या सहा वर्षात शहराच्या रचनेत, पायाभूत सुविधांमध्ये बदल झाला आहे. हे लक्षात घेऊन सर्व मॅरेथॉन मार्गांचे नियोजन करावे, असे आयुक्त राव यांनी नमूद केले. असून सर्व महापालिका अधिकाऱ्यांनी या मॅरेथॉनमध्ये सहभाग घ्यावा, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले. तसेच, त्यासाठी आतापासूनच दररोज तयारीला लागावे, असेही आयुक्त राव म्हणाले.

**प्रथम पारितोषिक एक लाख रुपयांचे**

या मॅरेथॉनचे आयोजन ठाणे महापालिका आणि ठाणे जिल्हा अॅथलेटिक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने होते. असोसिएशच्या सूचनेनुसार, एकूण १० लाख ३८, ९०० रुपयांची पारितोषिके, चषक व पदके असतील. प्रत्येक गटातील प्रथम विजेत्यास एक लाख रुपयांचे पारितोषिक आहे. तर, प्रत्येक गटात प्रथम १० विजेत्यांना पारितोषिके व चषक देण्यात येणार आहेत, असेही आयुक्त राव यांनी जाहीर केले.



ठाणे महापालिका चषक ३१व्या वर्षा मॅरेथॉनचे स्पर्धेच्या आयोजनाबाबत गुरुवारी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्यासमोर क्रीडा विभागाच्या वतीने सविस्तर सादरीकरण केले. उपायुक्त (क्रीडा) मीनल पालांडे यांनी २०१९ची मॅरेथॉन स्पर्धेचा आढावा आणि २०२५ची प्रस्तावित स्पर्धेची रुपरेखा या बैठकीत मांडली. त्याप्रसंगी, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपायुक्त मनीष जोशी, उमेश बिरारी, दिनेश तायडे, सचिन सांगळे, उपनगर अभियंता विकास ढोले, विनोद पवार आणि शुभांगी केसवानी, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसाद पाटील, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे यांच्यासह सर्व सहाय्यक आयुक्त, सर्व कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

**मॅरेथॉनमध्ये एकूण १२ गट**

ठाणे महापालिका चषक ३१व्या वर्षा मॅरेथॉन स्पर्धेत एकूण १२ गट असतील. राज्यस्तरीय गटामध्ये खुला गट (महिला व पुरुष)- २१ किमी, १८ वर्षावरील (महिला व पुरुष)- १० किमी, १८ वर्षाखालील (मुले व मुली)- १० किमी असे विभाग आहेत. तर, जिल्हास्तरीय गटात १५ वर्षाखालील (मुले व मुली)- ०५ किमी, १२ वर्षाखालील (मुले व मुली)- ०३ किमी, ज्येष्ठ नागरिक (पुरुष आणि महिला) - ५०० मीटर या गटांचा समावेश आहे.

**कॉर्पोरेट गट**

या मॅरेथॉनमध्ये माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, महापालिकेचे माजी अधिकारी यांच्यासाठी कॉर्पोरेट गट करण्यात आला आहे. त्यांच्यासाठी १ किमी अंतराची स्पर्धा ठेवण्यात आली आहे.

**यंदा २५००० धावपटू अपेक्षित**

सन २०१९मधील मॅरेथॉनमध्ये एकूण २३००० खेळाडू सहभागी झाले होते. त्यात, सैनिक शाळा, ठामपा शाळा, खाजगी शाळा यांचे विद्यार्थीही सहभागी झाले होते. याही वर्षी सुमारे २५००० खेळाडू मॅरेथॉनमध्ये सहभागी होणे अपेक्षित असल्याची माहिती उपायुक्त पालांडे यांनी दिली.

**नोंदणी पुढील आठवड्यापासून**

मॅरेथॉन करता नोंदणी पुढील आठवड्यापासून सुरू होणार असून विविध गटांच्या मार्गिका आणि सविस्तर कार्यक्रम टप्प्याटप्प्याने जाहीर करण्यात येईल, असेही उपायुक्त पालांडे यांनी स्पष्ट केले.

### सरकारी डॉक्टर खासगी दवाखान्यात?

## पालघरच्या सरावली आरोग्यकेंद्रात अनागोंदी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डहाणू :** पालघर जिल्ह्यातील आशागड प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या सरावली उपकेंद्रात गरोदर मातांच्या आरोग्य तपासणीसाठी आयोजित शासकीय शिबिर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीत सुरू असल्याचा प्रकार समोर आला आहे.

महत्त्वाचे म्हणजे या शिबिरात १३ 'हाय रिस्क' गरोदर महिलांची तपासणी न करता केवळ लसीकरणावर बोळवण करण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार, दर मंगळवारी उपकेंद्रांमध्ये गरोदर माता तपासणी शिबिरे घेणे बंधनकारक आहे. यामध्ये डॉक्टर, समुदाय आरोग्य अधिकारी आणि आरोग्य सेविका यांची उपस्थिती अनिवार्य असते. मात्र, सरावली उपकेंद्रावर डॉक्टर आणि समुदाय आरोग्य अधिकारी गैरहजेर असून केवळ सहाय्यक परीचारिका आणि आशा ताई उपस्थित असून शिबिर पार पाडण्यात आले आहे.

## मुंब्रा बायपासवर ट्रेलरच्या धडकेत एकाचा मृत्य

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - मुंब्रा बायपासवर बुधवारी रात्री भरधाव ट्रेलरची दुचाकीला धडक लागून अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील एकाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. तर, दुचाकीस्वार तरुणाच्या पायाला दुखापत झाली आहे. या प्रकरणी मुंब्रा पोलिस ठाण्यात फरार ट्रेलर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राबोडी येथील बापूजीनगर परिसरात राहणारा जुनैद सय्यद (२३) त्याच्या दुचाकीवरुन मुंब्रयाहून ठाण्याच्या दिशेने येत होता. त्याच्यासोबत त्याचा मित्र अलिशेर खान होता. दोघे मुंब्रा बायपास येथील जुन्या टोलनाक्याजवळ आले असता, त्यांच्या दुचाकीला भरधाव ट्रेलर चालकाने धडक दिली.

या धडकेत अलिशेर याचा जागीच मृत्यू झाला. तर अपघातात जुनैद याच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. यापक्रकणी मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून पोलिस ट्रेलर चालकाचा शोध घेत आहेत.

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक बांधकाम विभाग,
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत "आमदार निधी" या लेखाशिर्षक अंतर्गत "निवारा शेड बनविणे व आसन व्यवस्था करणे" अशा प्रकारच्या १० कामांकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे. अशा कंत्राटदारांना सदरच्या निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सुचना व प्रपत्र https://mahatenders.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर दि.११/०७/२०२५ ते दि.१८/०७/२०२५ रोजीपर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई टेंडरींग पद्धतीने दि.१८/०७/२०२५ रोजी १६:०० पर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि.२१/०७/२०२५ रोजी १२:३० वाजता उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील. अधिक माहितीसाठी दुरध्वनी क्र. ०२२-२५३४७७१४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

ठामपा/पिआरओ/सा.बा/४२३/२०२५-२६
दि.१०.०७.२०२५

**सही/-**
कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site www.thanecity.gov.in**



# शहापूरच्या शाळेची मान्यता रद्द झाली तरी मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये – रूपाली चाकणकर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / शहापूर : शहापूरच्या शाळेत घडलेल्या आक्षेपार्ह प्रकारानंतर शाळेची मान्यता रद्द करण्याची कारवाई शिक्षण विभाग करेल मात्र यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षण विभागाने तातडीने कार्यवाही सुरु करावी. तसेच पोलिसांनी पालकांना विश्वासात घेऊन सखोल तपास करावा असे निर्देश राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष श्रीमती रुपाली चाकणकर यांनी दिले आहेत. शहापूरच्या शाळेत स्वच्छतागृहात मासिक पाळीचे रक्त आढळल्याने मुख्याध्यापिकांनी महिला सफाईगारामार्फत सर्व मुलींची आक्षेपार्ह शारीरिक तपासणी केली. राज्य महिला आयोगाने या प्रकरणाची दखल घेतली असून राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष श्रीमती रुपाली चाकणकर यांनी आज शहापूर मध्ये पालकांची भेट घेतली. त्यानंतर शिक्षण विभागाचे अधिकारी आणि पोलीस ठाण्यात जाऊन आतापर्यंतच्या तपासाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. पालकांचे म्हणणे तसेच शिक्षण विभाग, पोलिस तपासाचा आढावा घेतल्यानंतर श्रीमती चाकणकर म्हणाल्या, शिक्षणाधिकारी यांनी शाळेची तपासणी केल्यानंतर शाळेत तक्रार निवारण समिती नसणे, सखी सावित्री समिती केवळ रजिस्टर नोंद असणे अशा अनेक गंभीर बाबी समोर आल्या आहेत. या गंभीर घटनेतील आरोपी मुख्याध्यापिका यांना निलंबित करण्यात आले आहे. तपासणी नंतर शिक्षणाधिकारी यांनी शाळेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शिक्षण विभागाला पाठविण्यात आला आहे. मात्र मान्यता रद्द झाल्याने मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते. तेव्हा सोमवार पासून स्वतंत्रपणे पुन्हा शाळा सुरु करणेबाबत कार्यवाही करावी अशा सूचना शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.पोलिस आढावा बैठकीत, 8 जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून 5 जण अटकेत आहेत. त्यांना 15 तारखेपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. उर्वरित 3 जणांची पोलिस चौकशी करण्यात येत आहे असे पोलिसांनी सांगितले. दोन विश्वस्त यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र इतर दोन विश्वस्त यांनाही आरोपी करण्याची मागणी करत पालकांनी या आधी घडलेल्या काही घटना सांगितल्या आहेत. याबाबत उद्याच पोलिस, पालक, शिक्षण विभाग यांची बैठक घेऊन पालकांच्या तक्रारी जाणून घेत सखोल तपास करावा, अशा सूचना श्रीमती चाकणकर यांनी पोलिसांना दिल्या आहेत. याप्रकरणी तपास जलद गतीने पुर्ण करत दोषारोपपत्र दाखल करण्याचे ही निर्देश त्यांनी दिले.अपमानजनक शारीरिक तपासणीला सामोरे गेलेल्या मुलींच्या मानसिकतेचा विचार करुन सर्व मुलींचे बाल कल्याण समितीकडून समुपदेशन करण्यात यावे असे ही श्रीमती चाकणकर यांनी प्रशासनास सांगितले.

# निराधार झालेल्या वृद्धाचं शिवसेनेने घेतले पालकत्व !

## आमदार राजेश मोरे यांनी केली विचारपूस



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : म्हातारपण खूप कठीण असतं याचा अनुभव डोंबिवलीतील प्रेम कुमार हे अनुभवत आहेत. आजारपणात त्यांच्या मुलानेच त्यांना दुर्लक्षित केले. परंतु शिवसेनेचे कल्याण ग्रामीण आमदार राजेश मोरे यांनी ही बाब समजताच हॉस्पिटलमध्ये जाऊन सविस्तर चौकशी केली. परिणामी तेथे त्यांना कोणीही नसल्याने त्यांचे पालकत्व घेतले. त्यांची पुढील देखभाल स्वतः मोरे यांच्याच माध्यमातून होणार असल्याने त्या प्रेमकुमार यांना मायेचा आधार शिवसेनेने दिला आहे. परिणामी शिवसेना ऐंशी टक्के समाजकारण आणि वीस टक्के राजकारण हे यामुळे सिद्ध झाल्याचे समोर येत आहे.

बुधवारी आमदार राजेश मोरे व शहर सचिव तथा विद्यानसभा क्षेत्रप्रमुख संतोष सिताराम चव्हाण, कल्याण ग्रामीण विधानसभा संघटक बंडू पाटील, माजी नगरसेवक रणजीत जोशी , संजय पावशे, शाखाप्रमुख गोठ्या सावंत , उपविभागप्रमुख वैभव राणे आदी पदाधिकारी उपस्थित यासह शिवसैनिक यांनी पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात त्या वृद्धाची भेट घेऊन तब्बेतीची विचारपूस केली. यावेळी डॉक्टरांनी त्या वृद्धाची प्रकृती स्थिर असल्याचे आमदार मोरे यांना सांगितले.

दरम्यान आमदार मोरे यांनी सांगितले, वृद्ध प्रेमकुमार यांना त्यांच्या मुलाने आश्रय हॉस्पीटल येथे ठेवले होते. मुलाने नंतर संपर्क केला नसल्याने नंतर आश्रय हॉस्पीटलवाल्यांनी पोलिस ठाण्यात तक्रार केली. नंतर वृद्धाला पोलिसांनी पालिकेच्या शात्रीनगर हॉस्पिटल मध्ये दाखल केले. ही बातमी समजात आम्ही हॉस्पीटल मध्ये येऊन प्रेम कुमार यांच्या तब्येतीची विचारपूस केली. शिवसैनिक परिवार त्यांची संपूर्ण काळजी व सर्व सहकार्य करणार आहे. औषध, जेवणाची सोय, राहाण्याची सोय शिवसेना करणार आहे. आपण समाजच काही तरी देणं लागतो याची जाणीव ठेऊन मदत करणार आहे. त्यांच्या राहण्याची सोय आम्ही मलंग रोड येथील जानव्ही आश्रय येथे करण्यासाठी बोलण सुरू आहे. तिकडे त्यांची राहण्याची सोय करणार आहे. कारण त्यांच्या दोन्ही पायाला दुखापत झाली आहे. त्यांची देखभाल करण्याकरता एक माणूस पाहिजे. येणारा सर्व खर्च शिवसेनेच्या माध्यमातून करणार आहे. आपण घरी जशी आई वडिलांची काळजी घेतो तशी घेणार आहे.

# जीवनदीपमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता





गोवेली : आपल्या जीवनात ज्ञानाच्या प्रकाशाने अंधकार दूर करून आपल्याला नेहमी योग्य मार्गदर्शन करणाऱ्या, आपल्याला घडवणाऱ्या गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजेच गुरुपौर्णिमा. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे गुरुपौर्णिमेचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला. विशेष म्हणजे दरवर्षी विद्यार्थी स्वतः आयोजक बनवून या कार्यक्रमाचे आयोजन करत असतात आणि आपल्या जीवनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा नम्र प्रयत्न करत असतात.यावेळेस महर्षी व्यासांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. तसेच शिक्षक वृंदांना पुष्प आणि भेटवस्तू देत त्यांचं स्वागत करण्यात आल.त्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती आपले भाव व्यक्त करत मनोगत सादर केले. या कार्यक्रमास अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .अशोक वाघ तसेच उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे यांची विशेष उपस्थिती होती. त्यांनी देखील विद्यार्थ्यांना योग्य मार्गाची निवड करण्यासाठी मार्गदर्शन केले त्यांना प्रोत्साहन मिळवून दिले. आणि सोबतच अनेक उदाहरणाच्या माध्यमातून गुरुपौर्णिमेच महत्व लक्षात आणून दिलं. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मास मीडिया विभागाची विद्यार्थिनी दिया झाटे हिने केले. यावेळेस सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. सतीश लकडे यांनी देखील मनोगत मांडले व आभार प्रदर्शन केले या कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व शिक्षक वृंदाचे विशेष सहकार्य व सहभाग लाभला अशाप्रकारे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला.

प.पू.स. रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता.शहापूर, जि.ठाणे



निष्ठावान भक्ताला परमेश्वराची म्हणजेच शाश्वत आनंदाची प्राप्ती होते, ती केवळ सदगुरुंमुळेच. त्यामुळे कितीही मोठा माणूस असला तरी त्याला मिळणारे ज्ञान, आत्मज्ञान या सर्वांच्या प्राप्तीसाठी सदगुरुंची आवश्यकता असतेच. म्हणतात ना,
गुरुविण कोण दाखवील वाट।
आयुष्याचा पथ हा दुर्गम, अवघड डोंगर घाट।।
गुरूमाऊली - प.पू.स. अलोकनाथजी महाराज

## आगामी गणेशोत्सवानिमित्त

# आयुक्तांची विविध यंत्रणांसोबत समन्वय बैठक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : दिनांक 27/8/2025 ते दिनांक 06/09/ 2025 या कालावधीत गणेशोत्सव सण साजरा होणार आहे. यासाठी मा. प्रशासक तथा आयुक्त श्री अनमोल सागर (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील गणेशोत्सव संबंधित विविध यंत्रणाची समन्वय बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीमध्ये बांधकाम विभाग, विद्युत विभाग, प्रभाग समिती क्रमांक 1 ते 5 व पोलीस यंत्रणा यांनी गणेश आगमन व विसर्जन मार्गाची संयुक्त पाहणी करून आवश्यक असणाऱ्या उपाय योजनांची माहिती तात्काळ सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले. शहरात ज्या ज्या ठिकाणी कृत्रिम तलाव उभारण्यात येणार आहेत अशा कृत्रिम तलावांची जागा निश्चित करणे तेथे आवश्यक सुविधांचा अहवाल सादर करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. शहरातील सर्व गणेश मंडळांच्या मंडपाच्या ठिकाणी व विसर्जन घाटांजवळ दररोज स्वच्छता करणे व त्या ठिकाणी जंतुनाशक व दुर्गंधीनाशक औषध फवारणी करणे. सर्व विसर्जन घाटांवर तसेच कृत्रिम तलावाशेजारी निर्माल्य कलशाची व्यवस्था करणे असे निर्देश दिले. तसेच गणेशोत्सव काळात शहरातील विद्युत पुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना टोरेंट पावर लिमिटेड देण्यात आल्या आहेत.

प्रभाग निहाय कृत्रिम तलाव उभारून, त्याच ठिकाणी मूर्ती स्वीकार केंद्र देखील सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी जास्तीत जास्त कृत्रिम तलावामध्ये मूर्तीचे विसर्जन करावे असे आवाहन आयुक्तांनी केले. पोलीस विभागाने देखील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक ती तयारी पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. प्रभाग अधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रभागात तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी, ज्येष्ठ नागरिक, सोसायट्यांचे पदाधिकारी यांच्याशी वेळोवेळी बैठका घेऊन अथवा समन्वय साधून त्यांना गणेश मूर्ती या कृत्रिम तलावात विसर्जन करण्यास प्रोत्साहित करावे असे निर्देश दिले. शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांपैकी जी मंडळे पर्यावरणपुरक गणेश मूर्ती, प्लास्टिकरहित सजावट, जास्तीत जास्त पुनर्वापर होणाऱ्या साहित्याचा वापर करतील, तसेच शासकीय नियमांचे आणि शिस्तीचे पालन करतील अशा मंडळांची पाहणी करून त्यातील प्रथम तीन विजेत्या मंडळांना पारितोषिक देण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी जाहीर केले. याकरिता एक समिती देखील स्थापन करण्यात येणार आहे. यंदाचा गणेशोत्सव पर्यावरण पूरक साजरा करून प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन देखील यावेळी करण्यात आले.

सदर बैठकीस मा.अतिरिक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके, सहाय्यक आयुक्त पोलीस (भिवंडी पूर्व) श्री. सचिन सांगळे, उपायुक्त (मुख्यालय) श्री. विक्रम दराडे, उपायुक्त (कर) श्री. बाळकृष्ण क्षिरसागर, मुख्य लेखा वित्त अधिकारी श्री. रामप्रसाद साळुंखे, शहर अभियंता श्री. जमील पटेल, भिवंडी वाहतूक विभाग श्री. अनंता वाघ, टोरंटो पॉवर लिमिटेडचे व्यवस्थापक तसेच महानगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

# गोपाळकाल्याने आषाढी यात्रेची सांगता

## पालख्यांचा परतीचा प्रवास सुरु

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पंढरपूर : गोपाळकाला गोड झाला, गोपाळाने गोड केला या जयघोषात अवघी श्रीकृष्णनगरी म्हणजेच गोपाळपूरनगरी लाखो वारकऱ्यांच्या गजराने दुमदुमून गेली. ज्ञानेश्वर माऊली तुकारामाच्या गजरात गोपाळपूरात मानाच्या पालख्यांसह सर्व संताच्या पालख्या दाखल झाल्या आणि गोपाळकाला केल्यानंतर श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी विठ्ठल मंदीरात आल्या. मानाच्या पालख्याने श्री विठ्ठलाचे दर्शन घेतले आणि परतीचा प्रवास सुरु केला.

पोर्णिमेच्या दिवशी परंपरेनुसार गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथे मानाची अंमळनेरकर महाराजांची दिंडी काल्याच्या उत्सवासाठी पहाटे 5.00 वाजता भगवान श्रीकृष्ण मंदिरात दाखल झाली. त्यानंतर भजन झाले. तर शेगावच्या श्री संत गजानन महाराज पालखीचे पहाटे 4.00 वाजता गोपाळपूरात आगमन झाले. पहाटेपासूनच एकामागोमाग एक अशा विविध सुमारे 450 संतांच्या दिंड्या, पालख्या विठ्ठलनामाचा गजर करीत गोपाळपुरात दाखल झाल्या होत्या.सकाळी 9.00 च्या सुमारास जगदगुरु श्री संत तुकाराम महाराजांची तर 10.00 च्या सुमारास संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचे पालखी सोहळे गोपाळपुरात दाखल झाले. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या तसेच श्री तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. मंदिराजवळ पालख्या विसावल्या होत्या. या पालख्यासह संत सोपानकाका, संत मुक्ताबाई, संत नामदेव महाराज, संत गोरोबा, संत एकनाथ महाराज, संत निवृत्तीनाथ महाराज, संत निळोबाराय, चांगावटेश्वर देवस्थान यांच्यासह अन्य संतांच्या पालख्यांचे व दिड्यांचे गोपाळपुरात आगमन झाले.

तत्पुर्वी गोपाळपुर येथील श्रीकृष्ण मंदीरात पहाटे 2.30 वाजता विश्वस्तांच्या हस्ते पूजा करण्यात आली. पूजा झाल्यानंतर पहाटे 3.30 वाजता श्रीकृष्ण मंदीर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले. भाविकांनी मोठ्या श्रध्देने श्री गोपाळकृष्णाचे दर्शन घेऊन मंदिराला प्रदक्षिणा घातली तसेच एकमेकांना प्रेमाने लाह्यांचा काला भरवून गळाभेट घेतली. श्रीकृष्ण मंदिर समितीच्या वतीने प्रसाद म्हणून लाह्यांच्या काल्याचे वाटप करण्यात आले.

# भिवंडीतील अपहृत मुलगा नवी दिल्लीतील दुकानात सापडला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : ठाणे जिल्ह्यातील भिवंडी माणकोली-डोंबिवली दरम्यानच्या पुलाजवळून अपहृत झालेला शाळकरी मुलगा थेट नवी दिल्लीत गजबजलेल्या सदर बाजारातील एका दुकानात सापडल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या मुलाचे व्हॉट्स अँपवरून लोकेशन सापडल्यानंतर मुलाच्या नातेवाईकांनी थेट माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्याकडे धाव घेतली. त्यानंतर कपिल पाटील यांनी तत्काळ नवी दिल्ली येथील त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना पोलिसांसह मुलाचा शोध घेण्यास सांगितल्यानंतर, अवघ्या तासाभरात सदर बाजारातील एका दुकानात मुलगा आढळला त्यामुळे मुलाच्या आई-वडिलांनी कपिल पाटील व पोलीस यांचे आभार मानले आहेत.

भिवंडी तालुक्यातील वेहळे येथील कु. रुद्र निलेश भोईर हा काल्हेर येथे दहावीत आहे. तो ४ जुलै रोजी माणकोली-डोंबिवली पुलाजवळील कॅफेमध्ये गेला होता. त्याठिकाणी सूट घातलेल्या एका व्यक्तीबरोबर तो बोलत होता.त्या व्यक्तीबरोबर आणखी दोघे जण होते.त्यानंतर चौघेही बोरिवली येथे गेले. बोरिवली येथे रुद्र याला रेल्वेचे तिकीट काढण्यास सांगितले गेले. त्यानंतर ते रेल्वेच्या जनरल डब्याने नवी दिल्लीला गेले. नवी दिल्लीच्या ट्रेनमध्ये बसेपर्यंतचा काहीसा घटनाक्रम रुद्र याला आठवत आहे. मात्र, त्यानंतर तो सदर बाजारात कसा पोचला, हे त्याला ठाऊक नाही.रुद्र हा हरविला असल्याचे समजताच त्याच्या नातेवाईकांनी पोलिसांकडे धाव घेऊन ठिकठिकाणी शोध सुरू केला. त्याचे वडील निलेश भोईर हे पंढरपूर येथे यात्रेला गेले होते. ते तातडीने घरी परतले. मात्र, तीन दिवस त्यांना मुलाचा शोध घेण्यास यश आले नाही. दरम्यानच्या काळात ७ जुलै रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास रुद्रचे व्हॉट्स अँपवरून लोकेशन समजले. निलेश भोईर यांच्यासह नातेवाईकांनी तत्काळ माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील व त्यांचे स्वीय सहायक राम माळी यांच्याबरोबर संपर्क साधत त्यांची निवासस्थानी भेट घेतली. त्यामुळे पाटील यांनी नवी दिल्ली bपोलिसांची संपर्क साधून शोध घेण्याची विनंती केली.त्यामुळे दिल्ली पोलिसांनी शोध सुरू केला असता बाजारातील एका दुकानात रुद्र हा आढळला.त्यावेळी व्हीडीओ कॉलवरुन पोलिसांनी रुद्रचा आई-वडिलांबरोबर संवाद घडविला. त्यानंतर रुद्र हा सुखरुपपणे घरी परतला.

**आम्हाला आमचा मुलगा परत मिळाला त्यामुळे आई वडीलांनी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील व पोलिसांचे यांचे आभार मानले.**

# शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी शिक्षक उपसंचालकांना निवेदन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : रायगड जिल्ह्यातील खाजगी प्राथमिक शाळा कर्मचारी संघटनेच्या वतीने विभागीय शिक्षण सहाय्यक उपसंचालक सुनील सावंत यांची संघटनेच्या वतीने भेट घेऊन विविध समस्या सोडवण्यासाठी मागणी केली.

खाजगी शाळेतील शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न, वेतन खात्यातील प्रलंबित प्रश्न, न्यायालयीन प्रकरणे, वरिष्ठ व निवड श्रेणी प्रकरण, वेतन खात्यामध्ये कायमस्वरूपी अधीक्षकाची नेमणूक करणे चालू महिन्याचे पगार बिलंब आदी विषयावर सविस्तर चर्चा करून या रायगड जिल्ह्यातील खाजगी प्राथमिक शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवावेत अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष संदीप कदम उपाध्यक्ष सुधाकर जैवळ कार्याध्यक्ष साईनाथ गावंड सरचिटणीस यशवंत मोकल कोषाध्यक्ष धनाजी घरत प्रसिद्धी प्रमुख ज्ञानेश्वर ठाकूर यांनी नुकतीच भेट घेतली.

रायगड जिल्ह्यातील खाजगी प्राथमिक शिक्षकांचे पगार वेळच्यावेळी मिळावे याकरिता कायमस्वरूपी वेतन खात्यामध्ये अधीक्षक यांची नेमणूक करणे. अपुरा कर्मचारी वर्ग पुरेसा करणे आधी विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर अंशतः अनुदानित 20 टक्के 40 टक्के 60 टक्के अनुदान घेत असलेल्या शिक्षकांना कायमस्वरूपी निधी मिळावा यासाठी आझाद मैदानावर गेली दोन दिवस उपोषण चालू आहे या संदर्भात देखील संघटनेचे पदाधिकारी यांनी उपोषणाला प्रत्यक्ष भेट देऊन पाठिंबा जाहीर केला

# प्राथमिक शिक्षकांचे प्रश्न सोडविण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आश्वासन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



शहापूर ग्रामिण : प्राथमिक शिक्षकांची पदोन्नती, वेतन, निवडश्रेणी आदी प्रश्न सोडविण्याचे आश्वासन ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी झालेल्या बैठकीत दिले.

कास्ट्राईब शिक्षक संघटना,महाराष्ट्र राज्य व कर्मचारी महासंघाच्या वतीने शिक्षक व मागासवर्गीय कर्मचारी यांच्या असलेल्या विविध प्रलंबित प्रश्नां बाबत संघटना व महासंघ पदाधिकारी यांची मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या समवेत बैठक पार पडली. यामध्ये वेतन दिरंगाई, विकल्प विपरीत शिक्षक पदस्थापना व वेतन, जिल्हाअंतर्गत बदली प्रकियेत कायम भरती, निवडश्रेणी प्रस्ताव मंजूरी, वरिष्ठ वेतन श्रेणी प्रस्ताव, केंद्रप्रमुख पदोन्नती, जुनी पेन्शन योजना लागू करणे, बिंदू नियमावली रजिस्टर अद्यावत करणे,वेतन समानीकरण प्रस्ताव मंजूरी, सेवानिवृत्ती शिक्षक उपदान निधी मागणी अशा अनेक प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. सदर, प्रश्नांबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रश्नांबाबत समाधान कारक उत्तरे व सकारात्मक प्रतिसाद देत ते सोडविण्याचे आश्वासन देण्यात आले.

या बैठकीवेळी कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष विजय कुमार जाधव, राज्य कार्यकारिणी सदस्य अशोक गायकवाड, उपमुख्यकार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे, प्राथमिक जिल्हा शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे, मुख्यलेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, समाजकल्याण अधिकारी उज्वला सपकाळे, संघटनेचे कोकण अध्यक्ष संतोष गाढे, केंद्र प्रमुख अध्यक्ष विनायक भालेराव, दिव्यांग विभाग सचिव जया पराडकर, शिवाजी बिबराळे, पालघर जिल्हा सचिव अनिल राठोड आदी पदाधिकारी उपस्थित होते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी अँण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024